




दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार २८ सप्टेंबर २०२४ | अंक २९३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# देशासाठी एका घराने किती त्याग करायचा?


# तुम्ही त्यांच्यावर टीका करता? शरद पवार यांचे सवाल

## ‘एका घराने किती त्याग करायचा?’

“नेहरू आयुष्याचे १४ वर्ष तुरुंगात होते. कशासाठी? तर देश स्वतंत्र करण्यासाठी. जी व्यक्ती १२ वर्ष तुरूंगात राहते त्यांच्यावर तुम्ही टीका करता? इंदिरा गांधी यांनी काय केलं नाही? पाकिस्तानने मस्ती करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांनी सांगितलं की, आम्ही सगळ्यांसोबत दोस्ती करू इच्छितो आणि मात्र आमच्या वाट्याला गेलं तर आम्ही शांत बसणार नाही हे सांगितलं. पाकिस्तानचे दोन तुकडे केले. एक बांगलादेश केला. ताकद दाखवून दिली”, असं शरद पवार म्हणाले.




राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी आज आपल्या भाषणात भाजपवर सडकून टीका केली. “काल पाऊस आला म्हणून पुण्याचा दौरा रद्द केला. मी बापू पठारेंना म्हटलं की, सभा होणार आहे की नाही? ते म्हणाले, पंतप्रधान येवो किवा न येवो आपली सभा होणार. पाऊस आला तरी सभा होणार. त्यानंतर आज तुम्ही मोठ्या संख्येने उपस्थित आहात. ते म्हणायचे, ४०० च्या खाली येणार नाही. लोकांना वाटायचं की मोदी हैं तो मुमकीन हैं. लोकांना वाटायचं की ४०० जागा येणार”, असं म्हणत शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टोला लगावला. “भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेची चौकट घालून दिली. देश चौकटीत घालून दिला. मोदींच्या सहकाऱ्यांना हे उद्धस्त करायचं होतं. एक मंत्री होता, म्हणाला की, ४०० जागा आम्हाला पाहिजे. आम्हाला घटना बदलायची आहे. एक महिला भगिनी म्हणाली की, संविधान बदलना हो तो ४०० पार चाहिये. माझ्यासारखे लोक अस्वस्थ होते. घटना बदलण्याचा अधिकार दिला असता तर तुमच्या अधिकारांचं काय? आम्ही लोक एकत्र आलो. केंद्रात आघाडी केली. अनेक पक्षाच्या लोकांना आम्ही एकत्र केलं आणि ४०० च्या आसपास जाण्याचा प्रयत्न आम्ही हाणून पाडला”, असं शरद पवार म्हणाले.‘फसवाफसवीचे राजकारण करतात’ “पाच वर्षापूर्वी निवडणूक झाली तेव्हा काँग्रेसला 1 जागा आणि राष्ट्रवादीच्या 4 जागा होत्या. आम्हाला चिंता होती. मात्र मला विश्वास होता. कालच्या लोकसभेत ३१ जागा जिंकल्या. १० जागा लढवल्या आणि ८ जागा निवडून आणल्या. तो बदल महाराष्ट्राच्या निवडणुकीत दाखवायचा आहे. एक देश, एक निवडणूक घेण्याचा निर्णय घेतला आणि महाराष्ट्र निवडणूक घेण्याचा निर्णय घेतला नाही. याचं कारण स्पष्ट आहे. फसवाफसवीचे राजकारण करतात”, अशी टीका शरद पवारांनी केली. “काल ते हरयाणात होते, जम्मूत होते. देशाची हिताची जपणूक करणे बोलले असते तर आम्ही कौतुक केलं असतं. महागाई कमी करणं यावर बोलले असते तर कौतुक केलं असतं. असा एक राजकर्ता आहे का त्याने तीन पिढ्या देशासाठी घालवल्या? या नेत्यांचं योगदान नाही का देशासाठी? जवाहरलाल नेहरू तुरुंगात होते”, असं शरद पवार म्हणाले.



# काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रोहिदास पाटील यांचं निधन.

**बीड प्रतिनिधी :-**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्य सरकारमधील माजी मंत्री रोहिदास पाटील यांचं आज दुःखद निधन झालं. ते 89 वर्षांचे होते. मागच्या काही दिवसांपासून रोहिदास पाटील आजारी होते. आज शुक्रवारी सकाळी 11 च्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला. रोहिदास पाटील यांनी काँग्रेसच्या काळात विविध खात्याचे मंत्रीपद भुषवलं होतं. रोहिदास पाटील हे काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष आणि आमदार कुणाल पाटील यांचे वडील आहेत.उत्तर महाराष्ट्रातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते म्हणून रोहिदास पाटील यांची ओळख होती. धुळे जिल्ह्याला वरदान ठरणारे अक्कलपाडा धरण बांधण्यात रोहिदास पाटील यांनी पुढाकार घेतला होता. धुळे जिल्ह्यात अनेक शैक्षणिक संस्था काढून गरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सुविधा त्यांनी उपलब्ध करुन दिली.कुठे होणार अंत्यसंस्कार? उद्या सकाळी एस एस व्ही पी एस महाविद्यालयाच्या प्रांगणात रोहिदास पाटील यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. काँग्रेसचे महत्त्वाचे नेते अंत्यविधीला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना आणि नातवंड असा परिवार आहे.

# मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यतीत बकासुर, सर्जा, सोन्या, हिंदकेसरी नामांकित बैलजोड्यांचा थरार बीडकरांना पाहायला मिळणार...!

## राजेंद्र मस्के मित्र मंडळाचे उत्कृष्ट नियोजन ..!

( **बीड प्रतिनिधी** ) आता पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर बीड मध्ये सुद्धा भव्य मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष, शेतकरी मित्र राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने बीड शहरा जवळील तळेगाव शिवारात29 सप्टेंबर रविवार रोजी सकाळी 09.00 वा मैदान सुरु होणार आहे. बहुचर्चित मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यतीमध्ये महाराष्ट्रातील नामांकित बैल बकासुर, सर्जा, सोन्या, हिंदकेसरी यासारख्या धडाकेबाज बैलजोड्या शर्यतीत सहभागी होणार आहेत.




हौशी शेतकरी बांधवांना पश्चिम महाराष्ट्रा प्रमाणे आपल्या जिल्ह्यात बैलगाडा शर्यतीत सहभाग घेता यावा यासाठी राजेंद्र मस्के मित्र मंडळ यांनी गतवर्षी प्रमाणे याहीवर्षी बैलगाडा शर्यतीचे आयोजन केले असून, बैलगाडा शर्यतीचे हे तिसरे वर्ष आहे. मागील वर्षी घोषित केल्याप्रमाणे प्रथम बक्षीस सोनालीका ट्रॅक्टर ठेवण्यात आले असून, इतर सहा रोख आकर्षित बक्षिसे विजयी स्पर्धकांना देण्यात येतील. बीडसह महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातून शेतकरी तथा स्पर्धक संपर्क साधत असून, हजारोच्या वर शेतकरी स्पर्धेत सहभागी होतील असा अंदाज आहे. शर्यतीचे उत्कृष्ट नियोजन करण्यात येत असून, पार्किंग व्यवस्था, पिण्याचे पाणी आदीसह प्रेक्षकांच्या सुरक्षेसाठी बॅरेकेट बसवण्यात आले आहेत. तरी जिल्ह्यातील हौशी शेतकरी बांधवानी बैलगाडीचा थरार पाहण्यासाठी बहु संखेने उपस्थीत राहावे असे आवाहन राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे. ऑनलाई नाव नोंदणीकरिता संपर्क– अविनाश नवले- 9921114954, 9130887888, अजय सावंत - 9359005879

# आहारात मोड आलेल्या कडधान्यांचा वापर का करावा?



मोड आलेली कडधान्य खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते. त्यामुळे आपल्या शरीराचे अनेक आजारांपासून संरक्षण होते. मोड आलेल्या कडधान्यात व्हिटॅमिन ए आणि सी असते. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत मोड आलेल्या बियांत क जीवनसत्त्व अधिक प्रमाणात असते. मूग, उडीद व मटकी यांच्या बिया तेलावर भाजून (तिखट - मिठासह) केलेल्या पदार्थास ‘दाल मोठ’ (डाळमूठ) म्हणतात. मटकीची मुळे मादक असतात; ज्वरात मटकी पथ्यकर आहे. मटकी वाजीकर (कामोत्तेजक), पित्तविकाररोधक, पाचक व हृदयास बल देणारी आहे.



# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात स्वामी विवेकानंद यांच्या शिकागो परिषदेतील भाषण लेखनाचा अनोखा उपक्रम

**दैनिक लोकआरंभ//**

माजलगाव प्रतिनिधीदिनांक २७/०९/२०२४ येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात संस्थेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर व कार्यवाह डॉ हेमंत वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली ११सप्टेंबर१८९३ शिकागो येथील स्वामी विवेकानंदांच्या प्रेरक भाषणाच्या प्रसंगाच्या स्मरणार्थ “तेच भाषण कालोचित समजून देण्यासाठी सद्यपरिस्थिती त्यास खूप प्रसंगोचित आहे.समाज जागृत करण्यासाठीची एक उत्तम सेवा संधी

शिकागो येथे झालेल्या धर्म परिषदेतील स्वामी विवेकानंद यांच्या भाषण लेखनाचा अनोखा उपक्रम महाविद्यालयात घेण्यात आला. या उपक्रमात संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी , कार्यवाह एड विश्वास जोशी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुरपे, प्रकाश दुगड , संस्थेचे सभासद , प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे, कार्यालय अधीक्षक श्री. विजय कुलकर्णी यांच्यासहित महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व जवळपास 1835 विद्यार्थ्यांनी या भाषण लेखन करण्याच्या उपक्रमात सहभाग नोंदविला. या आगळ्या वेगळ्या उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

# अजित पवार गटात मोठं वादळ, मुख्य प्रवक्ता राजीनामा देण्याच्या तयारीत

## उमेश पाटील राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत. त्यांनी तसं वक्तव्य देखील केलं आहे.

### उमेश पाटील काय म्हणाले?

“राजन पाटलांनी सहकारी कारखाना खासगी करून स्वतःच्या नावावर केला. शेतकऱ्यांचा कारखाना हडप करणाऱ्या नेत्याला सहकार परिषदेचा अध्यक्ष करणे हे हास्यस्पद आहे. मात्र सरकारने त्याच राजन पाटलांना दिले. सहकारी संस्था मोडीत काढणे, हडप करणे असा अनुभव असलेल्या नेत्याला सहकार परिषदेचे अध्यक्ष केले आहे. हा अत्यंत चुकीचा निर्णय आहे. मोहोळ तालुक्यातील माणसाला सहकार परिषद अध्यक्ष केले त्याबद्दल अभिनंदन. मात्र त्या व्यक्तीला नेमले हे दुर्दैवी”, अशी भावना उमेश पाटील यांनी मांडली.

**बीड (प्रतिनिधी)**

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळचे माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाचे नेते राजन पाटील यांची महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. सहकार परिषदेच्या अध्यक्षांना राज्यमंत्री पदाचा दर्जा आहे. त्यामुळे राजन पाटील यांना थेट मंत्रिपदाचा दर्जा मिळाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाचे प्रवक्ते उमेश पाटील आणि राजन पाटील यांच्यातील वाद उफाळून



बाहेर आलेला असताना त्यांची निवड झाल्याने राजन पाटलांचे पक्षात पारडे जड असल्याचं स्पष्ट झालं आहे. त्यामुळे उमेश पाटील हे नाराज झाले आहेत. उमेश पाटील हे आता राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत. मी पदाचा राजीनामा लिहून ठेवला आहे, असं उमेश पाटील म्हणाले आहेत. उमेश पाटलांनी राजीनाम्याचे बंद पाकीट दाखवले. “राजन पाटील ही दुराग्रही, अत्याचारी व्यक्ती आहे हे मी अजित पावरांना सांगितले होते. त्यामुळे माझा राजन पाटलांना विरोध राहणार आहे”, अशी भूमिका उमेश पाटील यांनी मांडली. त्यामुळे मोहोळमध्ये अजित पवार गटात मोठं वादळ आल्याचं बघायला मिळत आहे. मोहोळमधील जन सन्मान यात्रेत अजित पवार आणि खासदार सुनील तटकरे यांनी राजन पाटलांना न्याय दिला नसल्याचे विधान केले होते. मात्र लवकरच राजन पाटील राज्याच्या राजकारणात दिसतील, असेही विधान त्यांनी केले होते. राजन पाटलांच्या निवडीने उमेश पाटलांचे पक्षातील वर्चस्व कमी झाल्याचे चिन्हं आहेत. राजन पाटील यांना ही मोठी जबाबदारी मिळाल्यानंतर उमेश पाटील यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

# लोकशाहीसाठी प्रत्येक मत महत्त्वाचे

**निवडणूक विशेष लेखमाला**
**लेख क्रमांक 001**

नुकतीच झालेली लोकसभेची निवडणूक आणि येणाऱ्या काळात होणारी विधानसभा निवडणूक ही खऱ्या अर्थाने तंत्रज्ञानाचा फायदा घेणारी निवडणूक ठरणार आहे. यापूर्वीच्या काळात ज्यांनी निवडणूक कामकाज केले आहे, अशा सर्वांना ही निवडणूक नवा अनुभव देणारी ठरणार हे निश्चित आहे. तंत्राच्या क्रांतीमुळे पूर्वीच्या मतपेट्या आणि मतपत्रिका छपाई अशा खूप मोठ्या व्यापातून सर्वांची सुटका झालेली आहे. याच पार्श्वभूमीवर मतदारांची मानसिकता देखील महत्वाची ठरणारी आहे. काय फरक पडतो माझ्या एका मताने... असा विचार करणारा मतदार आता मतदान करण्यास ऊत्सुक असल्याचे सकारात्मक चित्र यंदा दिसत आहे. यामागेही तंत्राची प्रगती हेच कारण आहे. गेल्या दशकभरात मुद्रीत माध्यमांसोबत इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला. वृत्तवाहिन्यांची संख्या वाढली. आऊटडोअर ब्रॉडकास्टींग व्हॅन्स अर्थात ओ.बी.व्हॅन्सची जागा आता सॅटेलाईट लिंकिंग किट्सनी घेतल्याने प्रक्षेपण क्षेत्रात क्रांती आली. यामुळे कोणत्याही ठिकाणावरुन थेट प्रक्षेपणासाठी लागणारे मनुष्यबळ तसेच खर्च यात कपात झाली. परिणामी छोट्या छोट्या ठिकाणांवरुन थेट प्रक्षेपण आपल्याला बघायला मिळत आहे. दुसऱ्या बाजूला संवेदनशील मतदान केंद्रांवर होणार असलेल्या मतदानावर निवडणूक आयोग वेबकास्टींगच्या मदतीने थेट लक्ष ठेवत आहे, यामुळे निवडणूक प्रक्रीया अतिशय पारदर्शी होणार आहे. याचाही सकारात्मक परिणाम निवडणुकीत आपणास दिसेल, लोकांची नकारात्मक व उदासीन मानसिकता यामुळे निश्चितपणे दूर होणार आहे. यंदाच्या निवडणुकीत आणखी एक महत्वाचा बदल दिसणार आहे तो म्हणजे मतदान करण्यासाठी ज्या पोलचिटस् (Voter Slip) चा वापर होतो, त्या फोटो पोलचिटस् निवडणूक यंत्रणा मतदारांना स्वत: देणार आहे. यापूर्वी राजकीय पक्ष या प्रकारचे काम करताना दिसत होते. निवडणूक आणि खर्च असंही एक गणित आहे. यंदा उमेदवारांना आयोगाने खर्चाची मर्यादा वाढवून दिली. याचा फायदा उमेदवार उचलत आहेत. त्यामुळे अर्थव्यवस्थेला गती प्राप्त झाल्याचे चित्र दिसत आहे. या माध्यमातून जनतेपर्यंत ते पोहचत आहेत. दुसऱ्या बाजूला निवडणूक आयोगाने मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवलेली आहे. इंटरनेटच्या माध्यमातून फेसबूक व ट्विटर ( आता X ) आणि व्हाट्सअप सारख्या सोशल मीडियातूनही याबाबत प्रचार व प्रसाराचे कार्य होत आहे. नव माध्यम अर्थात सोशल मीडिया सध्या मोठ्या प्रमाणावर सक्रिय आहे याचा सकारात्मक व नकारात्मक परिणाम मतदारांवर होऊ शकतो. मोठ्या प्रमाणावर माहितीचे वहन सध्या सोशल मीडियाच्या माध्यमातून होत आहे परंतु या माहितीतली सत्यता सांगणे अशक्य असते त्यामुळे मतदारांनी सजगपणे या माहितीकडे बघितले पाहिजे. कॉपी-पेस्ट आणि फॉरवर्ड असा प्रकार न करता माहिती खरी आहे याची खात्री प्रत्येकाने आगामी काळात करावी अशी जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकाकडून अपेक्षा राहणार आहे. यंत्रणा आपल्या पद्धतीने यावर लक्ष ठेवत आहे परंतु सजग मतदार म्हणून मतदाराची भूमिका यात महत्त्वाची ठरणारी आहे. या सर्व बदलांसह येणाऱ्या निवडणुकीत ज्याला राजा म्हटले जाते अशा मतदार राजाला पटलं पाहिजे की... ‘हो... माझ्या एका मतानेही फरक पडतो....’ म्हणजेच निवडणुकीतील मतांचा टक्का वाढेल.

-प्रशांत दैठणकर,
जिल्हा माहिती अधिकारी

# नवीमुंबई येथे इंडियन आयकॉनिक सन्मान महासोहळा संपन्न !!

अमरदीप बालविकास फाऊंडेशन आणि महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्थेच्या वतीने “इंडियन आयकॉन सन्मान महासोहळा” साहित्य मंदीर, वाशी नवीमुंबई येथे मोठ्या उत्साहात थाटामाटात संपन्न झाला.

यासंगी विविध क्षेत्रात, “उल्लेखनीय व अनमोल कार्य” करणाऱ्या सेवाव्रतींना “राष्ट्रीय ह्युमन वेल्फेअर आयकॉनिक पुरस्कार व राज्यस्तरीय अमरदीप कर्तृत्व गौरव पुरस्कार” दिग्गज अतिथींच्या हस्ते प्रदान करुन, त्यांचा यथोचित ‘गौरव’ करण्यात आला. सदरहू महासोहळ्याची संकल्पना एन.डी.खान यांची होती. तर संयोजिका सौ.सलमा खान होत्या.यावेळी पनामा राष्ट्राचे वाणिज्य दूत श्री.जिजस कंपोस, से.नि. विभागीय उपायुक्त , नाशिक श्रीम.संगीता धायगुडे, कर्करोग शास्त्रज्ञ डॉ.अमजदखान पठाण, वकील व समाजसेवक, ॲड.रमेश खेमू राठोड, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे माजी शिक्षण अधिकारी डॉ.जिवबा केळूसकर हे प्रमुख अतिथी म्हणून तर सिने अभिनेता व हास्य कलाकार तथा तारक मेहता का उल्टा चष्मा फेम श्री.नितीन देसाई,सिने अभिनेत्री उर्मिला डांगे, उद्योजक अब्दुल कय्युम,सिने अभिनेता तथा दिग्दर्शक प्रसाद भागवत, आणि जागतिक विक्रम वीर गिर्यारोहक कु.अन्वी घाटगे हे सन्मा अतिथी म्हणून उपस्थित होते.याप्रसंगी प्रमुख अतिथी व अतिथी यांचा त्यांच्या कार्य क्षेत्रातील ‘अनमोल कामगिरी’ बद्दल संस्थे तर्फे ‘सन्मान’ करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थापक एन.डी.खान यांनी केले. तर कार्यक्रमाचे निवेदन लेखिका व साहित्यिक सौ.गीतांजली वाणी यांनी उत्तमरीत्या केले. यावेळी प्रदर्शित होणाऱ्या “कर्मवीर आबासाहेब” या बायोपीक चे प्रमोशन अल्ताफ दादासाहेब शेख व त्यांच्या टीमने उत्कृष्टपणे केले. सर्व कलाकाराना संस्थेच्या वतीने “सन्मानित” करण्यात आले.यावेळी तारक मेहता का उल्टा चष्मा फेम, हास्य कलाकार , अभिनेता नितीन देसाई यांची हास्य मेजवानी, गजानन नरवाडे यांनी नाकाने वाजवलेली बासरी, गीतकार विलास देवळेकर लिखित व एकनाथ धयाळकर यांनी स्वरबद्ध केलेल्या ‘स्वागतगीत’ आणि, अभिनेत्री रंजिता पाटील व अभिनेत्री उर्मिला डांगे यांच्या ‘कोळी गीताच्या’ नृत्याने उपस्थित मंत्रमुग्ध झाले..सदरहू महासोहळ्याचे अप्रतिम “आयोजन व नियोजन” केल्याबद्दल, फिल्म सेन्सॉर बोर्ड चे माजी सदस्य विलास खानोलकर व पायलट अमर खानोलकर यांनी महासोहळ्याचे संयोजक एन.डी.खान व सौ.सलमा खान यांचा यथोचित “सत्कार” केला. याप्रसंगी कर्करोग शास्त्रज्ञ डॉ.अमजद खान पठाण लिखित व इनोव्हेटिव्ह मानबिंदू प्रकाशन प्रकाशित “ असदबाबांचा स्तमित करणारा जीवन प्रवास” या पुस्तकाचे प्रकाशन प्रमुख पाहुणे संगीता धायगुडे यांच्या शुभहस्ते झाले

# योगिता पाखले महाराष्ट्र नारी शक्ती पुरस्काराने सन्मानित.

**नाशिक-( प्रतिनिधी)**

नाशिक : भाग्योदय लेखणीचा साहित्यिक मंच आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय साहित्य संमेलनात पाठयपुस्तकातील कवयित्री,साहित्यिका सुमतीताई पवार आणि जेष्ठ कवी चंद्रकांतदादा वानखेडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

योगिता पाखले ह्या निवेदिका , व्याख्यात्या ,कवयित्री , मुलाखतकार म्हणून सुप्रसिद्ध आहेत. साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनिय आहे. त्यांना यापूर्वी देखील अनेक राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.



या कार्यमाचे आयोजन गुजरात राज्यातील वलसाड मधील भाग्योदय साहित्यिक समूहाच्या संस्थापिका/ अध्यक्ष भाग्यश्री बागड यांनी केले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या 30 लोकांना सन्मानित करण्यात आले .हा कार्यक्रम नाशिक येते माहेरघर मंगल कार्यालयात मोठया उत्साहात संपन्न झाला.

पुरस्कार वितरणाबरोबर बहारदार कमी संमेलन देखील येथे गाजले.70 कवींनी आपल्या कविता सादर केल्या. कवी संमेलनाचे सूत्रसंचालन अमोल चिने यांनी तर पुरस्कार वितरण सोहळ्याचे खुमासदार ,रंगतदार सूत्रसंचालन योगिता पाखले यांनी केले आणि रसिकांची मने जिंकली.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आयोजक प्रदीप बडदे ,राकेश बागड यांनी विशेष मेहनत घेतली.

# राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघच्या माध्यमातून मे. ई.एफ.सी लॉजिस्टीक इंडिया प्रा. लि.कंपनीतील कामगारांना मिळाली पगार वाढ

**उरण प्रतिनिधी :-**

उरण दि २७(उरण प्रतिनिधी )राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ च्या वतीने मे. ई.एफ.सी लॉजिस्टीक इंडिया प्रा. लि. मु. वेश्वी, ता. उरण या कंपनी मधील रिफर डिव्हिजन कामगारांचा रू ५७००/- वेतनवाढीचा करार संपन्न झाला. राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ (RMBKS) चे राष्ट्रीय उपाध्यक्ष कामगार नेते संतोषभाई घरत व रायगड जिल्हा अध्यक्ष गणेश यशवंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि कामगार संघटनेचे राष्ट्रीय महासचिव एन. बी. कुरणे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २५/९/२०२४ रोजी RMBKS



कार्यालय जासई उरण येथे वेतनवाढ करार संपन्न झाला.या प्रसंगी मे. ई.एफ.सी लॉजिस्टीक प्रा. लि. चे व्यवस्थापक हेमंत राणे, कमर्शियल हेड शंकर पिल्लाई व कामगार प्रतिनिधी मनोहर नाईक, के. जानकीरामन हे उपस्थित होते. सदर करारामध्ये रू. ५७००/- ची भरघोस वाढ झाली. बेसीकमध्ये ५०% रक्कम व इतर भत्त्यांमध्ये ५०% आणि कालावधी ३ वर्षाकरीता करण्यात आला. ओटी, महागाई भत्ता, बोनस, रेनकोट, सेफ्टी शुज, ईतर सुविधा तसेच सरकारी नियमा नुसार सर्व फायदे देण्याचे व्यवस्थापनाने मान्य केले. राष्ट्रीय मुलनिवासी बहुजन कर्मचारी संघ (RMBKS) च्या नेतृत्वामुळे कामगारांना विविध सेवा सवलती चांगल्या पद्धतीने उपलब्ध होत असल्यामुळे कामगार वर्गा मध्ये आनंदाचे वातावरण असून सर्व कामगारांनी कंपनी प्रशासन तसेच राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ (RMBKS) च्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

# प्रा.ईश्वर मुंडे यांच्या गाव भेट दौऱ्याची शंभरी तुतारी पोहचवली घरो घरी अन बाजारा बाजरी

**धारूर/वडवणी/माजलगाव (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक कांही दिवसावर येऊन ठेपली आहे.माजलगाव मतदार संघात पावसाने वातावरण गारे गार केलेले आसले तरी महा युतीचे घड्याळ कोणाला मिळेल? महा विकास आघाडीची तुतारी कोणाला मिळेल ? खा.शरद पवार यांना कोण कोण भेटले या चर्चेने वातावरण गरम झालेले आहे.

तुतारी कडे कोण येणार अन तुतारी कोणाला भेटणार या चर्चेत न आडकता माजलगाव विधानसभा मतदार संघात आपल्यालाच उमेदवारी भेटेल व आपणच तुतारी वाजवू या अपेक्षेने प्रा. ईश्वर आनंदराव मुंडे हे मात्र पायाला भिंगरी बांधून माजलगाव मतदार संघ पिंजून काढत आसल्याचे चित्र दिसत आहे.

बीड जिल्हा परिषदेमध्ये शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी पदावर नौकरी करून खा.शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेऊन सक्रीय समाजकारण व राजकारण करणारे प्रा.ईश्वर मुंडे बीड लोकसभा निवडणूकीच्या वेळी उमेदवारीच्या चर्तेत आलेले होते.

माजलगाव मतदार संघाचे शेवटचे टोक व आपले स्वत:चे गाव गांजपूर येथून आपल्या आई-वडीलांच्या उपस्थितीत सुरू केलेल्या गाव भेट दौरा कार्यक्रमाने मतदार संघातील धारूर व वडवणी तालुक्यांतील शंभर गावे पूर्ण केलेली आहेत.

आपल्या गाव भेट दौऱ्याचा फार गाजावाजा न करता, किती मानसे उपस्थीत राहतील याची काळजी न करता, शक्य होतील तेवढेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सोबत घेऊन सकाळी आठ ते संध्याकाळी आठ या



वेळेचे नियोजन करून गावा गावात जाणे,मंदीरात दर्शन घेणे,घरोघरी भेटणे, दुकान,टपरी,हॉटेल,,बाजारात भाजी पाला विकणारे शेतकरी, खेळणी,भांडे व खाऊचे पाल,रस्त्याने ये -जा करणारी मानसे यांना आदरपूर्वक नमस्कार करणे,विधानसभा निवडणूक,खा.शरदचंद्र पवार,आ.जयंत पाटील,पक्षाची भुमिका व तुतारी वाजवणारा माणूस हे पक्षाचे निवडणूक चिन्ह सांगत आपल्या परिचय पत्राची छापील पॉम्पेट हातात देवून पुढे चालणे असा प्रवास चालू आहे.

माजलगाव मतदार संघात महा विकास आघाडीची उमेदवारी कोणाला भेटेल हे लवकरच जाहीर होईल परंतू खा.शरदचंद्र पवार हे सोशल इंजिनिअरींग चा प्रयोग करतील व उमेदवारी आपल्यालाच मिळेल,आपणच लढू व जिंकू या आत्मविश्वासाने प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे माजलगाव मतदार संघ पिंजून काढत आहेत.उच्च शिक्षित,प्रशासकीय सेवेचा अनुभव,चारित्र्य संपन्न व सतत हास्य वदनी नवीन चेहऱ्यास जनतेचा उदंड प्रतिसाद मिळत आहे.

दैनिक लोकआरंभ लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २८ सप्टेंबर २०२४
https://lokaarambh.com



# बजरंग सोनवणे यांची खासदारकी रद्द करा; हायकोर्टात दाखल याचिकेत आरोप काय?

बीड लोकसभा मतदारसंघात धुरळा उडवून देणारे बजरंग सोनवणे यांची खासदारकी रद्द करण्यासाठी हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे बजरंग बप्पा यांनी बीडच्या हायहोल्टेज लढतीत विजय खेचून आणला होता. त्यांनी भाजपच्या दिग्गज नेत्या पंकजा मुंडे यांचा पराभव केला होता. पण आता त्यांच्या निवडीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल करण्यात आली आहे. माजी नगरसेवक अमर नाईकवाडे, नारायण शिरसाट यांनी सदर याचिका दाखल केली आहे. आज याचिकेवर न्या. ए.एस.वाघवसे यांच्यासमोर सुनावणी झाली असता सोनवणे यांच्यासह सर्व प्रतिवाद्यांना नोटीस बजावण्यात आली. 24 ऑक्टोबर रोजी याचिकेवर पुढील सुनावणी होईल. याचिकेतील आक्षेप काय? काही मतदान केंद्रावरील मतांवर आक्षेप घेण्यात आलेला आहे. तसेच पोलिंग बूथ केंद्रांची संख्या वाढवताना राजपत्रानुसार प्रसिद्ध करणे गरजेचे होते. पण निवडणुकीच्या ऐन तीन दिवस अगोदर पोलिंग बुथ वाढवण्यात आले. या गलथान कारभारामुळे 4,261 मतदार मतदानापासून वंचित राहिले. या मतदान केंद्रावरील मतदान अवैध आहे. त्यामुळे ही मतमोजणी ग्राह्य धरण्यात येऊ नये, अशी विनंती करण्यात आली. माजलगाव शहरांमधील बूथ क्रमांक 68 केंद्रावरील ईव्हीएम मशीनमधील घोळामुळे 774 मतदान हे मोजण्यात आलेले नाही. वैध




असणारे 1156 पोस्टल मतदान हे बेकायदेशीरपणे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी बाद केलेले आहेत. तसेच निवडणूक निर्णय घोषित करताना 909 मतांचा फरक आढळून येत आहे. हे सर्व मतदान निवडणुकीच्या निकालावर परिणाम करणारे आहे.प्रतिवादी बजरंग सोनवणे नामनिर्देशन फॉर्म भरताना शपथपत्रात खोटी माहिती पुरवलेली आहे. या आदी मुद्द्यावर खंडपीठाने याचिका दाखल करून घेतली आहे. प्रतिवादींना चार आठवड्यात कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे. ॲड. शशिकांत ई. शेकडे यांनी याचिकाकर्त्यांची बाजू मांडली. त्यांना ॲड. पृथ्वीराज ए. ढाकणे, ॲड. बी. एस. बोडखे ,ॲड. विशाल थावरे, ॲड.आर.जी.नरवडे व एन.एस. राठोड यांनी सहकार्य केले.

## एकूण झालेले मतदान आणि मोजलेले मतदान यात फरक

बीडमध्ये मतदानाच्या दोन दिवस अगोदर बूथ क्रमांक 86 ए, 130 ए, 139 ए,140 ए, 170 ए, 190 ए, 12 ए असे एकूण 7 मतदान केंद्र अचानक वाढविण्यात आले. त्यामुळे 4261 मतदारांना मतदान करता आले नाही. तर माजलगाव मधील बूथ क्रमांक 68 वरील 774 मतदान मोजण्यात आलेलं नाही. याशिवाय वैध असलेले पोस्टल मतदानात एकूण 1156 मतदान बाद करण्यात आले आहे. निवडणूक आयोगाने एकूण झालेले मतदान आणि प्रत्यक्ष मोजले गेलेले मतदान यांच्यात जवळपास 909 मतांचा फरक असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

# कांदिवली येथे भारतीय जनता पार्टी चारकोप विधानसभा कार्यकर्ता मेळावा जल्लोषात संपन्न.



भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. गुरुवार दिनांक २६ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजता कांदिवली पश्चिम येथील माखेचा सभागृह,मंगुभाई दत्ताणी रोड, इराणी वाडी या ठिकाणी भारतीय जनता पार्टी चारकोप विधानसभा कार्यकर्ता मेळावा मोठ्या जल्लोषात संपन्न झाला.यावेळी आगामी निवडणुका व केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ यावर प्रमुख मार्गदर्शक चारकोप विधानसभा आमदार योगेश सागर यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.चारकोप विधानसभा मध्ये मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे १७००० महिलांना पैसे मिळाले आहे.मुंब ई मधील भाजपचे खासदार, आमदार, नगरसेवक, वरिष्ठ कार्यकर्ता,व वार्ड चे पदाधिकारी, चांगले काम करतात.यावेळी बोरीवली पेक्षा जास्त मतांनी कांदिवली चारकोप आमदार निवडून यायला पाहिजे.या भारतीय जनता पार्टी चारकोप विधानसभा चे नगरसेवक, वरिष्ठ पदाधिकारी, शक्ती प्रमुख,बुथ प्रमुख,वार्ड चे पदाधिकारी व इतर कार्यकर्ते पुरुष व महिला या मेळाव्याला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. मेळाव्या नंतर सर्वांसाठी भोजन व्यवस्था करण्यात आली होती.

# गायक व संगीतकार एकनाथ धयाळकर यांचा वाशी येथे सत्कार

नुकताच रविवार दि २२ सप्टेंबर २०२४ रोजी वाशी येथे "अमरदीप बालविकास फाऊंडेशन आणि महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था" यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मा. संगीता धायगुडे, मा. डॉ अमजद खान पठाण, मा. ॲड नितीन देसाई, मा. उर्मिला डांगे, मा. प्रसाद भागवत, मा. कु. अन्वी घाटगे यांच्या उपस्थितीत, सुरुवातीला विलास देवळेकर लिखित इंडियन आयकॉन स्वागत गीत आणि पर्यावरण गीत, गायक व संगीतकार एकनाथ धयाळकर यांनी आपल्या सुमधुर आवाजात सादर केले. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्फुर्द प्रतिसाद दिले.

तसेच एकनाथ धयाळकर यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल, मा. श्री जिजस कॉपेस पनामा राजदूत यांच्या हस्ते शाल- स्मृतिचिन्ह- आणि गळ्यात पदक घालून,सन्मानपत्र देऊन, राज्यस्तरीय अमरदीप कर्तृत्व गौरव पुरस्कार-२०२४ देऊन, सत्कार करण्यात आले.

ह्या कार्यक्रमाची संकल्पना आणि नियोजन मा. श्री एन. डी. खान तसेच, प्रमुख संयोजिका सौ. सलमा एन. खान. आणि सौ. गीतांजली वाणी यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले. मुख्य प्रवेशद्वार जवळच अक्षरश्री विलास देवळेकर यांच्या ६ फूट "कविता फ्लॅक्सने" सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. त्यामुळे बऱ्याच जणांनी त्या सोबत 'फोटोही' काढले आहेत.

# दिवा स्टेशन पुर्व परिसरातील वाहतूक कोंडी सुटणार.

**संतोष पडवळ - प्रतिनिधी**

ठाणे, दिवा ता २७ सप्टेंबर : दिवा रेल्वे स्थानक पुर्व ते दिवा चौक परिसरातील वाहतूक कोंडीमुळे दिवेकरांसह वाहनचालक मेटकुटिला आले आहेत त्यात फेरीवाले व बेशिस्त रिक्षा चालक रिक्षा कोठेही उभी करतात त्यामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीचा फटका हा रेल्वे फाटकाला देखील पडत असून त्यामुळे रेल्वे सेवा देखील कधी कधी बाधित होत आहे. शिवसेना दिवा शहराच्या मागणी नंतर आज दिवा स्टेशन परिसरातील होणारी वाहतूक कोंडी, रिक्षा स्टँडची जागा स्टेशन परिसरातील फेरीवाला याचा आढावा घेण्यासाठी ठाणे महानगरपालिकेचे सहायक आयुक्त अक्षय गुडधे यांच्यासह संबंधित विभागीय अधिकारी, अभियंते, ठाणे वाहतूक विभागाचे वपोनि खराडे तसेच शिवसेना दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी, उपशहर प्रमुख शैलेश पाटील, मा. नगरसेवक अमर पाटील, दिपक जाधव तसेच आदेश भगत, उमेश भगत, चरणदास म्हात्रे



यांच्यासह दिवा शिवसेनेचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दिवा स्थानक पुर्व ते दिवा चौक १५० मीटर वर फेरीवाला हटविणे, रिक्षा स्टॉण्ड जागा बदलने, रस्त्याच्या समांतर दोन्हीही बाजूने नवीन गटार तसेच दिवा चौकातील चंद्रागण इमारती समोर नवीन गटर बांधणे यावर सकारात्मक निर्णय झाला असल्याचे दिवा शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी यांनी स्पष्ट केले आहे.

# नाळवंडीतील आरोग्य शिबिरात १ हजार २६५ रुग्णांची तपासणी डॉ.योगेश, डॉ.सारिकाताई क्षीरसागरांचा स्तुत्य उपक्रम

**बीड (प्रतिनिधी)** दि.२७ : तालुक्यातील नाळवंडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पुढाकारातून मोफत आरोग्य शिबिर शुक्रवारी (दि.२७) घेण्यात आले. शिबिरात १ हजार २६५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून गटनिहाय हा उपक्रम राबविण्यात येत आहे.



नाळवंडी येथील प्राथमिक आश्रम शाळेत आरोग्य शिबिराचे उद्घाटन केले. दिवसभरात १ हजार २६५ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. ६८२ जणांना मोफत चष्मे वाटप केले. १३२ जणांची रक्त तपासणी, १६२ जणांची ईसीजी केली. तर १७ जणांनी रक्तदान केले. उद्घाटन प्रसंगी डॉ.क्षीरसागर दाम्पत्यासह जि.प.चे माजी सदस्य तथा सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, राष्ट्रवादी काँग्रेससचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, माजी पं.स.सदस्य अच्युतराव शेळके, सुधाकर काकडे, अरुण लांडे, दत्ताप्रसाद सानप, मंगलताई म्हेत्रे, संगीताताई वाघमारे, अशोक वैद्य, बबन वाघमारे, मिलींद ठोकळ, संजय काळे, शेख बिलाल, रामहरी कुटे, सुमंत राऊत, शाम राऊत यांच्यासह पंचक्रोशीतील रुग्ण व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कवि सरकार वाचनालय इंगळी आयोजित कोल्हापूर साहित्याचा जागर .

( कोल्हापूर ) २९ सप्टेंबर२०२४ रोजी सकाळी १० वाजता कोल्हापूर शेतकरी कामगार पक्ष कार्यालय व शाहू मैदान जवळ कवि सरकार स्वाभिमानी वाचनालय इंगळी आयोजित राज्यस्तरीय १९वे मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाचा होणार जागर . यासाठी संमेलन अध्यक्ष प्रा . पी एस पाटील तारळे खुर्द हे भूषवणार आहेत तर उद्घाटक म्हणून कवि डॉ रामचंद्र गोविंद चोथे अकिवाट यांचे हस्ते होणार असून प्रतिमा प्रजन कॉ . बाबुराव कदम स .शे . का . प कोल्हापूर यांचे हस्ते करण्यात येणार आहे .तर प्रमुख पाहुणे साहेबराव खरे उन्हासननगर मुंबई . संमेलनात नवोदित कविच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन प्रसिद्ध कांदबरीकार डॉ श्रीकांत पाटील घुणकी यांचे हस्ते होणार आहे . तसेच प्रमुख उपस्थीत अभिनेते 'प्रा सुशिल डवर कणकवली . भाऊसो कांबळे ममदापूर अशोक मोहिते बार्शी त्याचप्रमाणे कविसंमेलन अध्यक्ष कवि दादासाहेब शेख भरणे रत्नागिरी असून संमेलनात सौ पुजा शेलार यांचा वेनूनाद ' भाऊसाहेब कांबळे ममदापूर यांचा भरारी दादासाहेब शेख यांचा हळव्या मना कवि सरकार संपांदन श्रावणातले सणवार आणि साहित्य संमेलन विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे . या संमेलनात कोल्हापूर 'मुंबई पुणे 'सोलापूर ' नांदेड परभणी ' फोंडाघाट ' सिंधुदर्ग ' खेड रत्नागिरी . सांगली ' धाराशिव जिल्ह्यातील कवि कवियत्री सहभागी होणार आहेत असे कवि सरकार यानी पत्रकद्वारे कळविले आहे .



मनोज जरांगे पाटील यांची गॅलेक्सी हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे यांनी भेट घेतली...

# रा.काँ पार्टी शरद पवार पक्षाच्या वतीने परळी मतदारसंघात शेतकरी संवाद यात्रे संदर्भात पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न

**परळी (प्रतिनिधी)** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जेष्ठनेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली तर युवानेते सुनील भैया गुट्टे यांच्या नेतृत्वात परळी मतदारसंघात शेतकरी संवाद यात्रेचे आयोजन करण्यात आले असून या यात्रेच्या पूर्वतयारीसाठी बैठक रत्नदीप निवासस्थानी शुक्रवार दि 27 सप्टेंबर रोजी संपन्न झाली. हि शेतकरी संवाद यात्रा रविवार दि 29 सप्टेंबर ते दि 7ऑक्टोबर या दरम्यान होणार आहे. परळी मतदारसंघात 9 दिवस 423 किलोमीटरचा प्रवास करत 86 गावच्या सरासरी अंदाजे150000 दीड लाख शेतकरी, शेतमजूर व नागरिकांशी थेट संवाद करणार असून परळी मतदारसंघातील नागरिकांची थेट भेटीगाठी घेऊन या भागातील प्रश्न जाणून घेण्याचा हा प्रयत्न या यात्रेच्या माध्यमातून होणार आहे. मागच्या काही दिवसांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली शेतकरी मोठ्या संकटाचा सामना करत आहे. परळी मतदारसंघातील अनेक लोकांच्या छोट्या-मोठ्या अनेक समस्या आहेत या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न या यात्रेच्या माध्यमातून असणार आहे. या यात्रेमध्ये हजारोच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे .



या बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेत्या सौ सुदामतीताई गुट्टे होत्या तर युवक नेते सुनील भैया गुटे तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी मार्गदर्शन केले या बैठकीला उपस्थित रमेश ढाकणे, महारुद्र कदम, ईश्वर जिजा सोनवणे, माऊली महाराज आगलावे ,सय्यद फिरोज, महबूब कुरेशी, रामेश्वर कडभाने, अनिल घाडगे ,दत्तराव घोडके, बाबासाहेब गव्हाणे ,उद्धवराव सटले ,राम पवार, कृष्णा राठोड, पवनकुमार बोडके, गणेश देवकते, प्रभाकर सटाले, प्रणिता अटोळे, ज्योतीराम हरे ,अनंत हरे, राधाकिसन लुगडे, साई नरवाडी ,सोमेश कांदे ,भगवान कातकडे, बबनराव काळे, दत्ताभाऊ शिंदे यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लाडकी बहिण देवा भावावर रागीवली

**मुंबई प्रतिनिधी**

काल संध्याकाळी सुमारे सात साडेसातच्या दरम्यान मंत्रालयाच्या सचिव गेटमधून एक महिला मंत्रालयात आली. तिने थेट सहाव्या मजल्यावरील राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दालन गाठले आणि दालनात तोडफोड केली. दालनाबाहेर मुख्यदरवाजा समोर असलेल्या ३ ते ४ फुलदानी इतस्त फेकून फोडल्या. कार्यालयात असलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांसमोर आरडाओरड केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाच्या पाटीची तोडफोड केली. त्यानंतर सदर महिला निमुटपणे मंत्रालयाबाहेर पडली. तोवर मंत्रालयीन सुरक्षेसाठी तैनात असलेल्या यंत्रणेला याचा थांगपत्ता लागला नाही. त्यामुळे मंत्रालयीन सुरक्षेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उभे राहीले असून राज्यातील लाडक्या बहिणीसाठी उदार झालेल्या आपल्या सरकारवर देवा भाऊवर लाडकी बहिण का रागावली असा सवाल निर्माण झाला आहे.

मंत्रालयात शासकीय कर्मचारी अधिकारी व्यतिरीक्त बाहेरील व्यक्तिंना प्रवेश करताना स्वताचे शासनमान्य ओळखपत्र (आधारकार्ड पॅनकार्ड, वाहनचालक परवाना, मतदान कार्ड) दाखविल्या नंतर रांगेतून योग्य तपासणी करूनच प्रवेश दिला जातो. असे असताना अनोळखी महिला सचिव गेट मधून आतमध्ये कशी काय आली. कार्यालयीन कामकाजाच्या कालावधी ५.३० नंतर बाहेरील व्यक्तीला प्रवेश दिला जात नाही त्या व्यक्तीने अगोदर कार्यालयीन



वेळेत गेटपास घेतला असला तरी ५.३० नंतर बाहेरील व्यक्तींना प्रवेश नाकारला जातो. त्यामुळे सदर महिला आतमध्ये कशी काय आली. त्यामुळे गृहखाते आणि मंत्रालयीन सुरक्षेवर सवाल करण्यात येत आहेत.

सदर महिला धनश्री सहस्त्रबुद्धे हिने यापुर्वी भाजप कार्यालयात जावून अशीच आरडाओरड करीत आदळआपट केली होती. तसेच तिने आपल्या राहत्या घरातही असेच प्रकार केलेले असून दादर पोलिस ठाण्यात तिच्या विरोधात काही रहिवाशांनी तक्रार केलेल्या आहेत. यावरून सदर महिला मनोरूग्ण असल्याचे बोलले जात आहे.

# सोयगाव शहरांवर ड्रोन कॅमेरा;-रात्री नऊ वाजेची घटना

छत्रपती संभाजीनगर(चैताली औटे) सोयगाव शहरासह आमखेडा, घोसला, नांदगाव नांदगाव तांडा या चार गावांवर शुक्रवारी रात्री नऊ ते साडे नऊ वाजेच्या सुमारास द्रोण कॅमेऱ्यात शहर व ग्रामीण भागात रेकी करण्यात आल्याचा प्रकार शुक्रवारी रात्री नऊ वाजता एका पादचाऱ्यांने रंगेहाथ पकडले मात्र ड्रोनला ऑपरेट करणाऱ्या चार ते पाच जणांनी त्या पायी जाणाऱ्या इसमाला घाबरविन्या साठी त्याचा पाठलाग केला त्यामुळे भेदरलेल्या अवस्थेत त्या पादचाऱ्याने शहर गाठले.

सोयगाव शहरासह आमखेडा व इतर तीन गावात रात्री नऊ वाजेच्या सुमारास अज्ञात चार ते पाच जणांनी द्रोण कॅमेरे द्वारे शहराची व ग्रामीण भागाचा रेकी केल्याच्या चर्चेने शहरात रात्री खळबळ उडाली होती त्यामुळे शहर वासीयांच्या मनात धडकी भरली आहे मात्र या द्रोण ला ऑपरेट करणाऱ्या चार ते पाच जनांना एका पायी जाणाऱ्या इसमाने रंगेहाथ पहिल्या वर त्यांनी त्याचा पाठलाग केला मात्र घाबरलेल्या अवस्थेत त्या इसमाने गाव गाठले होते या घटनेमुळे शहरात रात्रभर घबराटीचे वातावरण होते...

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
शनिवार २८ सप्टेंबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# नाहीतर तुमचा सिंघम फक्त पोस्टरवरच राहील ! सामनातून फडणवीसांवर निशाणा

**गृहमंत्री फडणवीस हे सिंघम, अभिमन्यू, यांच्याबरोबर कथा-पटकथाकार सलीम-जावेदही होऊ इच्छित आहेत.**

## फडणवीस जेथे जातील तेथे बलात्कार व महिला अत्याचाराचे सत्र सुरुच

पुण्याचा पोलीस आयुक्त हा एक नंबरचा बकवास व 'संघी' विचाराचा लोचट माणूस आहे. हे महाशय आयुक्त कमी व भाजपचे हस्तक म्हणून जास्त कार्य करीत आहेत. पोर्शे कारचे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न त्यांनी केला. यांच्या काळात पुण्यात अंमली पदार्थ, खून, भररस्त्यावर गँगवॉर, बलात्कारासारख्या गुह्यांत वाढ झाली आहे. पण सरकारचे अभय असल्याने पुण्यातील पोलीस आयुक्तांचा बाल बाका झाला नाही. सिंघम कम अभिमन्यू साहेबांनी राज्याच्या महिला वर्गालाच चक्रव्यूहात अडकवले आहे व बाहेरून भाजपचे दुर्योधन अबलांच्या पिंकाळ्यांची मजा घेत आहेत. देशाचे गृहमंत्री नाशकात असताना नाशकात बलात्कार होतात. पंतप्रधान पुण्यात येत असताना पुण्यात बलात्कार होतात. फडणवीस जेथे जातील तेथे बलात्कार व महिला अत्याचाराचे सत्र सुरूच आहे व हे सर्व रोखण्याचे सोडून गृहमंत्री फडणवीस हे आता 'धर्मवीर-3' चित्रपटाचे कथानक लिहायला बसणार आहेत.




**मुंबई /प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे स्वयंघोषित सिंघम 'धर्मवीर-3' लिहिणार आहेत. राज्यकर्ते त्यांची कामे सोडून ही स्टंटबाजी करत आहेत व राज्यात गुन्हेगार व बलात्कारी मोकाट सुटले आहेत. राज्याच्या या नव्या सिंघम साहेबांनी नालासोपारा व कोरेगावच्या बलात्काऱ्यांनाही 'बदला'पूरचाच न्याय द्यावा. नाहीतर तुमचा सिंघम फक्त पोस्टरवरच राहील! अशा शब्दांत शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना'मधून राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकास्त्र सोडण्यात आलं आहे. कथा-पटकथा लिहाव्यात असे अनेक 'खलनायक' भाजपात आहेत. फडणवीस यांनी त्या विषयांना हात घातला पाहिजे. गृहमंत्री फडणवीस हे सिंघम, अभिमन्यू, यांच्याबरोबर कथा-पटकथाकार सलीम-जावेदही होऊ इच्छित आहेत. एक ना धड भाराभर चिंध्या अशी त्यांची अवस्था झाली आहे. त्यात महाराष्ट्राच्या इभ्रतीच्या चिंध्या चिंध्या झाल्या आहेत, असा हल्लाबोल सामनामधून करण्यात आला. बदलापूरमधील शाळेतील लहान मुलींवर अत्याचार करणारा आरोपी अक्षय शिंदे याचा सोमवारी पोलिस एन्काऊंटरमध्ये मृत्यू झाला. त्यानंतर विरोधकांकडून या एन्काऊंटवर प्रश्न उपस्थित करण्यात आले, सरकारवर टीकाही करण्यात आली. मात्र महायुतीचे नेते, भाजप , शिंदे गटातील नेते यांनी मात्र या घटनेप्रकरणी प्रतिक्रिया देताना विरोधकांवरच टीका केली. अत्याच्याराच्या घटनेतील आरोपीचा खात्मा झाल्यावर विरोधकांच्या पोटात का दुखतंय, असा सवाल सत्ताधाऱ्यांकडून विचारण्यात आला. याच पार्श्वभूमीवर मुंबईत विविध बॅनर्सही लावण्यात आले. त्यावर देवेंद्र फडणवीस यांचा हातात बंदूक घेतलेला फोटो होता. तसेच 'बदला पुरा', "महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना असाच न्याय मिळणार" अशा आशयाचे काही बॅनर्स संपूर्ण मुंबईत तसेच वांद्रे येथील कलानगर परिसरातही झळकले. याच मुद्यावरून विरोधकांनी सरकारवर पुन्हा टीका केली. शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या सामनामधूनही याच मुद्यावरून सरकारला खडे बोल सुनावण्यात आलं आहे.




ठाणे : ठाणे महानगर पालिकेच्या दिवा प्रभाग समितीचे कार्यालयीन अधीक्षक सुनील खोपकर प्रदीर्घ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झाले. सदर निवृत्ती सोहळ्यानिमित्त सहायक आयुक्त अक्षय गुडधे यांच्यासह दिवा प्रभाग समितीच्या सर्व विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या. (फोटो - संतोष पडवळ ).

## पंजाबमध्ये अफगाणिस्तानाचा कांदा; खडबडून जागे झाले केंद्र सरकार, राज्यात घेतली धाव, आता पुढच पाऊल काय?

अफगाणिस्तानमधून पंजाब राज्यात कांदा आयात झाल्याच्या माध्यमांमधून बातम्या येताच केंद्र सरकार खडबडून जागं झाले. केंद्र सरकारने कृषी मंत्रालयातंर्गत शेतकरी कल्याण विभागाचे विपणनचे अर्थ सल्लागार कविरासन या एक सदस्य पथकाला राज्याच्या दौऱ्यावर पाठवले. नाशिक, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यामध्ये नवीन लाल कांद्याची झालेली लागवड आणि जुना साठवणूक केलेला उन्हाळा कांदा किती शिल्लक आहे याची माहिती हे सदस्य घेत आहेत. देशात कांदा साठा शिल्लक असताना थेट इतर देशात कांदा आणण्यात येत असल्याने कृषी विभाग गांगरून गेला आहे. आता एक सदस्यीय पथक पुढील अहवाल सादर करेल. शेतकरी, व्यापाऱ्यांशी केली चर्चाराज्यातील कृषी व पणन विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत आज नाशिक दौऱ्यावर असलेल्या पथकाने लासलगाव बाजार समितीला भेट दिली. बाजार समिती संचालक, शेतकरी, प्रतिनिधी, निर्यातदार व्यापाऱ्यांशी या सदस्याने एक तास चर्चा करत माहिती जाणून घेतली. हा दौरा संपल्यानंतर कांद्याचा अहवाल केंद्र सरकारकडे सादर करण्यात येणार असल्याची माहिती एक सदस्य पथकातील कविरासन यांनी दिली. केंद्राच्या धोरणावर टीकाकांदा लागवड व कांद्याच्या आवकेची माहिती घेण्यासाठी केंद्र सरकारकडून यापूर्वी चार ते पाच वेळा पथक पाठवण्यात आले. आतापर्यंत या पथका सोबत जी ही चर्चा



झाली ती कांद्याचे बाजार भाव कसे नियंत्रणात ठेवता येईल यावरच झाली. त्यांनी आमच्या सोबत चर्चा केली या चर्चेदरम्यान बाजार भाव हे केवळ पंधरा ते वीस दिवसांसाठी वाढतात. यावेळी थोडे फारच दर अधिकचे शेतकऱ्यांना मिळतात, अशी टीका शेतकऱ्यांनी केली.इतर देशातून कसा कांदा आयात होतो?हा कांदा जवळजवळ चार ते सहा महिने साठवणूक केलेला असतो. ज्यावेळी निर्यात बंदी होती त्यावेळी शेतकऱ्यांनी कांदा हजार रुपयांनी विक्री केला. आता मूठभर लोकांच्या हातात कांदा शिल्लक असताना निर्यात खुली केली. आता कुठेतरी केंद्र शासन निर्यात करा सांगतोय ही दुर्दैवी बाब आहे. दुसरीकडे अफगाणिस्तान सारख्या देशातून पंजाब मध्ये कांदा आयात केला जातोय या कांद्याला आयातीवर शुल्क नाही आणि भारतीय निर्यात होणाऱ्या कांद्यावर 20 टक्के निर्यात शुल्क लावले जाते. केंद्र सरकार पाकिस्तान आणि अफगाणिस्तान मधील शेतकऱ्यांसाठी काम करतोय का असा सवाल बाजार समितीचे शेतकरी प्रतिनिधी संचालकांनी केला आहे.

# अनिलदादा जगताप यांच्या संकल्पनेतून बीडमध्ये ५ ऑक्टोबर रोजी होम मिनिस्टर स्पर्धेचे आयोजन

**फ्रिज, टीव्ही, शिलाई मशीनसह विजेत्या महिलांना मिळणार पैठणी साडी; सर्व सहभागी महिलांना आकर्षक भेटावस्तु!**

बीड प्रतिनिधी- बीडच्या संस्कृतीक, क्रीडा, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात आपले सर्वोपरी योगदान देणाऱ्या शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या संकल्पना मार्गदर्शनाखाली बीड शहरातील महिला-भगिनींच्या अंगी असलेल्या कलागुणांना दर्जेदार व्यासपीठ मिळावे या उदात्त हेतूने दि. 5 ऑक्टोबर 2024 रोजी सायं 6.00 वाजता रामकृष्ण लॉन्स बीड येथे अमोल जाधव यांच्या वतीने भव्य दिव्य होम मिनिस्टर खेळ पैठणीचा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेमध्ये विजेत्या महिलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले असून विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. प्रथम क्रमांक प्राप्त विजेत्या



महिलेस फ्रिज, द्वितीय क्रमांक प्राप्त दोन महिलांना प्रत्येकी 1 एलसीडी टीव्ही असे दोन एलसीडी टीव्ही, तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या तीन महिलांना प्रत्येकी 1 शिलाई मशीन अशा तीन शिलाई मशीन व त्यानंतर पुढील 21 विजेत्या महिलांना प्रत्येक 1 पैठणी अशा 21 पैठणी साडी बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहेत. याबरोबरच होम मिनिस्टर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला संसार उपयोगी आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असल्याचे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन स्वतः महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील करणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बीडमधील महिला-भगिनींनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे येऊन आपल्या नाव नोंदणी करावी अथवा योगेश सारूक : ९१३२७३७४७५, अक्षय जगताप : ९७३०३७२२२२, नवनाथ बोबडे : ७०३०५६२५९०, दत्ता ताटे : ९५९५४३४४०५, लक्ष्मीकांत दोडके : ९९२२८३९७५३ यांच्याशी संपर्क साधून ऑनलाईन नाव नोंदणी करावी. - - - - -

## बीडमधील महिला-भगिनीं जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे- अनिलदादा जगता

बीडमधील महिला-भगिनींच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता माझे सहकारी अमोल जाधव यांच्या माध्यमातून होममिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे दि. 5 ऑक्टोबर रोजी रामकृष्ण लॉन्स बीड येथे सायं 6.00 वाजता भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले आहे. फ्रिज, एलसीडी टीव्ही, शिलाई मशीन, पैठणी साडी तसेच संसार उपयोगी असणाऱ्या भेटवस्तू देखील सहभागी महिलां-भगिनींना देण्यात येणार आहे. अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील हे स्वतः उपस्थित राहणार असून पूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ते स्वतः करणार आहेत. रोजच्या दैनंदिन व्यापातून स्वतःसाठी थोडासा वेळ काढून बीड शहरातील महिलांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या वतीने करण्यात आले आहे.
ooooo

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com